# <u>ई-गोल्ड हे भारतीय नियमांचा भंग करते : आरबीआय</u>
**ऑक्टोबर २१, २००२**

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे, की जनतेमध्ये काही संस्था / व्यक्ती असा समज पसरवून देण्याचा प्रयत्न करत आहेत की, 'ई-गोल्ड' नावाच्या एका तथाकथित इलेक्ट्रॉनिक चलनाचे व्यवहार भारतामध्ये मुक्तपणे करण्याची परवानगी आहे आणि 'ई-गोल्ड'ला एखाद्या परकीय चलनाचाच दर्जा आहे. या विषयी रिझर्व्ह बँकेकडे नुकतेच एक एक माहितीपत्रक आले असून, एका वृत्तपत्रासोबत वाटलेल्या या माहिती पत्रकात म्हटले आहे, की अनिवासी भारतीय भारतात रक्कमा पाठविण्यासाठी 'ई-गोल्ड'चा वापर करतात.

जनतेच्या माहितीसाठी रिझर्व्ह बँक स्पष्ट करीत आहे की, 'ई-गोल्ड' हे कोणत्याही सर्विभौम राष्ट्राचे चलन नाही. भारतातील प्रचलित नियमांनुसार 'ई-गोल्ड'चा कोणत्याही व्यवहारातील वापर नियम बाह्य आहे. नागरिक, बँका, मनीचेंजर्स व इतर वित्तसंस्थांना त्यांच्या व्यवहारांमध्ये 'ई-गोल्ड'चा वापर, एक चलन म्हणून करण्या विरुद्ध सावधगिरीची सूचना देण्यात येत आहे.

**अल्पना किल्लावाला**
**महा व्यवस्थापक**

**प्रेस रिलीज : २००२-२००३/४०९**